दै. रजि. नं.      /२०२६

दाखल ता. २८/०१/२०२६

Exh.1/c

समरी कि. के. नं. 92 /२०२६

**मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसो, कागल**
**यांचे कोर्टात...**

**श्री. उत्तम कृष्णात पोवार**
व.व. ३९, धंदा : शेती,
रा. शेंडूर, ता. कागल, जि. कोल्हापूर
मोबा. ९०४९७२०७५३
} फिर्यादी

विरूध्द

Order
Put up for verification
and argument

J.M.F.C.,Kagal
Dt.18/02/2026

**श्री. अशोक साहेबराव बहिरट**
व.व. ४८, धंदा : वाहन खरेदी–विक्री एजंट,
रा. अवनखेड, ता. दिंडोरी, जि. नाशिक
पिन –४२२ २०२
मोबा. ७०२८०८७८८७
} आरोपी

**निगोशिएबल इन्स्टुमेंटस् ॲक्ट**
**कलम १३८ प्रमाणे फिर्यादद.**

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

**यातील फिर्यादी यांची फिर्याद अशी की,**

१) यातील फिर्यादी व आरोपी यांची ओळख गावातीलच श्री. सुरज कृष्णात हजारे यांचेसोबत झालेली असून, आरोपी यांचा जे.सी.बी. खरेदी–विक्री करणेबाबतचे एजंटचा व्यवसाय आहे. यातील फिर्यादी यांना आरोपीन यांनी जुने जे.सी.बी. मशिन खरेदी करून देणेबाबत ठरवून आरोपीने जुने जे.सी.बी. मशिन गेवराई, जि. बीड येथील मशिन दाखवून सदरच्या मशिनची ठरलेली एकूण खरेदी किंमत रू. १७,००,०००/– (अक्षरी रू. सतरा लाख फक्त) ठरवून त्यापैकी दि. ११/०९/२०२५ इ. रोजी रक्कम रू. १,९०,०००/– (अक्षरी रू. एक लाख नव्वद हजार फक्त) इतकी रक्कम फिर्यादी यांचे फोनवरून Transaction ID No. T2509111729068234629183 ने आरोपीचे मोबाईल नं. ७०२८०८७८८७ या मोबाईल नंबरवती फोन पे व्दारे दिली. तसेच त्याच दिवशी म्हणजेच दि. ११/०९/२०२५ इ. रोजी फिर्यादी यांचे फोनवरून Transaction ID No. T2509111729456098444985 ने आरोपी यांचे सांगणेवरून आरोपीचे ड्रायव्हर श्री. आनंद दिनकर भादिवे यांचे मोबाईलवरती फोन पे व्दारे रक्कम रू. १०,०००/– (अक्षरी रू. दहा हजार फक्त) इतकी रक्कम अदा केलेली आहे. अशारितीने फिर्यादी यांनी एकूण रक्कम रू. २,००,०००/– (अक्षरी रू. दोन लाख फक्त) इतकी रक्कम संचकारापोटी आरोपीकडे जमा केलेली आहे. संचकार वजा जाता उर्वरित रक्कम जे.सी.बी. च्या खरेदी करारपत्रादिवशी देवून आरोपीने फिर्यादी यांना जे.सी.बी. ताब्यामध्ये देणेचे उभयतामध्ये ठरले होते व आहे.

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

२) तथापि, सदरचा व्यवहार करत असताना आरोपीने फिर्यादी यांना अचानकपणे असे सांगीतले की, जे.सी.बी.चे मालकांचे घरगुती अडचणीचे कारणामुळे सदरचा जे.सी.बी. विकण्याचे रद्द केलेले आहे. त्यामुळे तुम्ही दिलेली संचकार रक्कम माझेकडेच असून, ती तुम्हाला मी लवकरच परत करीन असे सांगून आरोपीने फिर्यादी यांना रक्कम रू. ९०,०००/— (अक्षरी रू. नव्वद हजार फक्त) इतकी रक्कम पोहोच करण्याचे आश्वासन देवून सदर व्यवहारातील साक्षीदार श्री. सुरज कृष्णात हजारे, रा. शेंडूर, ता. कागल, जि. कोल्हापूर व श्री. नुर अब्बास हैदर (नूरभाई), रा. रूई, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर यांचेपैकीं श्री. नुर अब्बास हैदर (नूरभाई) यांचे बॅक खातेवर फोन पे व्दारे अदा केलेली आहे. सदरची रक्कम आमचे अशिलांनी मिळालेली असून, उर्वरित रक्कम रू. १,१०,०००/-- (अक्षरी रू. एक लाख दहा हजार फक्त) इतक्या रक्कमेचा दि. २८/०९/२०२५ इ. रोजीचा बॅक ऑफ बडोदा, शाखा : दिंडोरी चा चेक नं. ०००००४३ देवून आरोपीने फिर्यादी यांना तुमची रक्कम पूर्ण भागविलेली आहे, त्यामुळे तुम्ही सदरचा चेक भरून तुमची रक्कम काढून घ्या असे आरोपीने फिर्यादी यांना सांगून पाठवून दिले.

३) सदरचे आरोपीचे बोलण्यावर विश्वास ठेवून यातील फिर्यादी यांनी सदरचा चेक त्यांचे खाते असलेल्या स्टेट बॅक ऑफ इंडिया, शाखा : कागल या बॅकेमध्ये दि. ०१/१२/२०२५ इ. रोजी जमा केला असता, सदरचा चेक फंडस् इनसफिसिएंट या शेऱ्यानिशी अनादर होवून परत आला. त्याचा मेमो दि. ०४/१२/२०२५ इ. रोजी फिर्यादी यांना प्राप्त झालेला आहे. त्यानंतर फिर्यादी यांनी आरोपी यांना सदरचा चेक अनादर झालेची कल्पना फोनव्दारे दिली व

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

चेकमधील नमूद रक्कमेची मागणी केली. तथापि, यातील आरोपी यांनी फिर्यादी यांची चेकमधील नमूद रक्कम आज देतो उद्या देतो असे सांगून जाणीवपूर्वक टाळाटाळ करून फिर्यादी यांना आजतागायत दिलेली नाही.

४) तद्नंतर फिर्यादी यांनी आपले वकील ॲड. अभिजीत सुकुमार सांगावकर यांचेमार्फत दि.१७/१२/२०२५ इ. रोजी चेक अनादर झालेबाबतची व चेकमधील रक्कम मागणी करणारी नोटीस पाठविली. सदरची नोटीस आरोपीस दि. २२/१२/२०२५ इ. रोजी मिळाली असून, सदर नोटीसीची पोहोच फिर्यादीचे वकीलांना दि. २२/१२/२०२५ इ. रोजी मिळालेली आहे. तथापि आरोपीने फिर्यादी यांची कायदेशीर देय रक्कम दिलेली नाही. त्यामुळे आरोपीने फिर्यादी यांना न वटणारा चेक देवून त्यांची फसवणूक केलेली असून भारतीय दंड संहिता व चलनक्षम दस्तऐवज कायद्याखाली गंभीर स्वरूपाचा गुन्हा केलेला आहे.

५) <u>फिर्यादीस कारण</u> :

यातील आरोपी यांनी फिर्यादी यांच्या कायदेशीर येणे असलेल्या रक्कमेच्या परतफेडीपोटी बॅंक ऑफ बडोदा, शाखा : दिंडोरी या बॅंकेचे खातेवरील रक्कम रू.१,१०,०००/– (रू.एक लाख दहा हजार फक्त) इतक्या रक्कमेचा चेक नं.००००४३, दि. २८/०९/२०२५ (अठ्ठावीस सप्टेंबर दोन हजार पंचवीस) इ. रोजी दिला. सदरचा चेक फिर्यादी यांनी आपले खातेवर दि. ०१/१२/२०२५ (एक डिसेंबर दोन हजार पंचवीस) इ. रोजी भरला असता, सदरचा चेक न वटता अनादर होवून दि. ०४/१२/२०२५

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

(चार डिसेंबर दोन हजार पंचवीस) इ. रोजी न वटता परत आला त्यावेळी तसेच त्यानंतर फिर्यादी यांनी आपले वकीलांचेमार्फत दि. १७/१२/२०२५ (सतरा डिसेंबर दोन हजार पंचवीस) इ. रोजी चेक न वटलेची व चेकमधील रक्कमेची मागणी करणारी नोटीस पाठविली. सदरची नोटीस आरोपीने दि. २२/१२/२०२५ (बावीस डिसेंबर दोन हजार पंचवीस) इ. रोजी स्विकारूनसुध्दा फिर्यादी यांची कायदेशीर देय रक्कम आजतागायत दिलेली नाही. त्यामुळे व त्यानंतर सदर फिर्यादीस कारण घडले आहे व घडत आहे.

६) <u>मुदत</u> :

यातील आरोपी यांनी फिर्यादी यांच्या कायदेशीर येणे असलेल्या रक्कमेच्या परतफेडी पोटी रक्कम रू. १,१०,०००/— इतक्या रक्कमेचा चेक दिला. सदरचा चेक फिर्यादी यांनी आपले खातेवर वटणेकरीता भरला असता, सदरचा चेक न वटता अनादर होवून परत आला. त्यानंतर फिर्यादीने आपले वकीलांचेमार्फत दि. १७/१२/२०२५ इ. रोजी आरोपीस नोटीस पाठविली. सदरची नोटीस आरोपीने स्विकारून सुध्दा फिर्यादी यांची कायदेशीर देय रक्कम मुदतीत दिलेली नाही. त्यामुळे सदरची फिर्याद मुदतीत आहे.

७) यातील फिर्यादी हे शेंडूर, ता. कागल, जि. कोल्हापूर येथे राहत असून, सदर चेकबाबतचा संपूर्ण व्यवहार मे.कोर्टाचे स्थलसिमेत घडला असलेने प्रस्तुत फिर्याद चालविणेचा व निर्णय देणेचा या मे. कोर्टाना पुर्ण अधिकार आहे.

८) फिर्यादीने आरोपीविरूध्द सदर चेकबाबतची फिर्याद अन्य कोणत्याही कोर्टात दाखल केलेली नाही अगर प्रलंबित नाही.

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

९) **सबब फिर्यादीची विनंती की,**

अ) आरोपीने फिर्यादी यांना त्यांचे खातेवर पुरेशी रक्कम नसताना चेक देवून फिर्यादी यांची निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट १३८ प्रमाणे गंभीर स्वरूपाचा गुन्हा केलेला आहे. त्यामुळे आरोपीस जास्तीत जास्त दंड व शिक्षा करणेत यावी.

ब) आरोपीने चेकची रक्कम न दिलेस आरोपीस वर नमूद चेकमधील रकमेच्या दुप्पट दंड करून त्यांचेकडून चेकची रक्कम वसूल होवून मिळावी.

क) सदरची रक्कम आरोपीने फिर्यादी यांना न दिलेस आरोपी यांची स्थावर व जंगम मालमत्तेची जप्ती अगर विक्री करून अगर आरोपीस जेलमध्ये ठेवून धनादेशाची रक्कम वसूल होवून मिळावी.

येणेप्रमाणे फिर्याद असे.

मे. जा. व्हावे.

कागल

ता. २८/०१/२०२६

**यासी पुरावा**

१) आरोपीने फिर्यादी यास दिलेला चेक नं. ००००४३, दि. २८/०९/२०२५ इ. रोजीचा अस्सल चेक.

२) फिर्यादीने सदरचा चेक बँकेत भरलेबाबतची अस्सल पावती.

३) स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा : कागल यांनी दिलेला मेमो, दि. ०४/१२/२०२५.

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

४) फिर्यादीने आपले वकीलांचेमार्फत आरोपीस पाठविलेल्या नोटीसीची स्थळप्रत दि. १७/१२/२०२५

५) सदरची नोटीस आरोपीस पाठविलेल्या नोटीसीची पोष्टाची पावती.

६) फिर्यादीने आरोपीस पाठविलेल्या नोटीसीबाबतचा पोष्टाचा ट्रॅक रिपोर्ट

७) फिर्यादीने आरोपीस ऑनलाईन पाठविलेल्या रक्कमेचे मोबाईलमधील स्क्रीन शॉटची प्रत.

## प्रतिज्ञा

मी यातील फिर्यादी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील फिर्यादीमधील संपूर्ण मजकूर माझे प्रत्यक्ष माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा आज मु।। कागल ता. २८/०१/२०२६.

Solemnly Affirmed before me by
Shri Uttam Krushnath Powar
Age 39 of Shahu Nagar Kagal who is
identified by Shri A. S. Jangavkar Adv
.............whom I know personally
Dated :-28/1/26

Assistant Superintendent

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

MADKE AJIT BHISHMA
Digitally signed by MADKE AJIT BHISHMA
Date: 2026.02.18 17:56:53 +0530